रात्र संपली की सकाळ उगवते
कितीसरळ साधे निसर्गाचे वागणे.
पण आपल्या आयुष्यात असे नसते बऱ्याचदा.
रात्र संपते पण सकाळ होतेच असे नाही.
कधी कधी रात्र संपतच नाही,
उगवतेही सकाळ पण छान प्रकाशाची नसते,
प्रकाशही असतो पण मनात काळवंडलेले ढग.

रात्र संपली की सकाळ उगवते, म्हणजे
सकाळ उगवते तेव्हा रात्र संपलेली असते.
पण आपल्या आयुष्यात असे नसते बऱ्याचदा.
सकाळ उगवली तरी आयुष्यात असे नसते.
सकाळ अंधारातच वावरत असते,
अंधारातच ती प्रकाशाची वाट पाहते,
प्रकाश येतोही, पण मनातच काळवंडलेले ढग.

२.१.२०१९